**<u>प्रतिवादी क्र. १ तर्फे साक्षीदार स्वत: प्रतिवादी क्र. ०१ पंढरीनाथ सुपडाजी प्रधान यांचा शपथेवर उलट तपास वादी तर्फे ॲड श्री. एस. आर. सोनोणे यांचे मार्फत सुरु-</u>**

६. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. ५ निर्मलाबाई ही माझी पहिली पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १ ते ४ ही आमची मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फुलंब्री येथील शेत जमीन गट क्र. १३९/१ मध्ये माझ्या वाटयाला ६० आर क्षेत्र व माझ्या भावांना ६१ आर क्षेत्र वाटयाला आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४ मधील संपूर्ण मजकूर मी खरा नमुद केला. हे म्हणणे खरे आहे की, वादींचा वाद मिळकतीमध्ये समान हिस्सा आहे.

उलट तपास पूर्ण.

**<u>प्रतिवादी क्र. २ व ३ तर्फे साक्षीदाराचा उलट तपास ॲड श्री एन.बी. सोनवणे यांचे मार्फत -</u>**

७. माझे शिक्षण इयत्ता दहावी पर्यंत झालेले आहे. मी पुर्वीपासून शेती व्यवसाय करायचो. मी नोकरी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे प्रतिवादी क्र. २ आशाबाई हिच्यासोबत दि.२४/५/१९७८ रोजी भिमनगर, भावसिंगपूरा,औरंगाबाद येथे लग्न झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आशाबाई हीच्याशी असलेल्या लग्न संबंधातून आम्हाला प्रतिवादी क्र. ३ सुजाता ही दि.०४/९/१९८४ रोजी जन्मास आली.
प्र. आशाबाई ही तुमची लग्नाची व कायदेशीर पत्नी आहे ?
उत्तर- माझी वादी क्र. ५ निर्मला ही कायदेशीर पत्नी आहे आणि आशा ही दुसरी पत्नी आहे.

८. मी निर्मला हिच्यासोबत माझी कायदेशीर लग्न झाल्याबाबत पुरावा म्हणून लग्नपत्रीका दाखल केली आहे. हे मला सांगता येणार नाही की, मी लग्नपत्रीका दाखल केली आहे. आता मला मी दाव्यात दाखल केलेले कागदपत्रे दाखवण्यात आले त्यामध्ये लग्न पत्रीका दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, निर्मलाबाई हीच्यासोबत माझे लग्न झाल्याबाबत लग्न नोंदणी दाखला दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, निर्मलाबाई हीच्याशी माझा कायदेशीर विवाह झाला नसल्याने मी ती कागदपत्रे दाखल केलेली नाही.

९. निर्मला हीच्या पासून झालेले मुलांमध्ये सुमित हा मोठा मुलगा आहे . सुमित ची जन्म तारीख १६/९/१९९२ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १ सुमित पेक्षा प्रतिवादी क्र. ३ सुजाता ही वयाने मोठी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१३९/१ मधून काही जमीन पाझरतलावाठी अधिग्रहीत करण्यात आली आहे. १ हे ४० आर जमीन अधिग्रहीत करण्यात आली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जमीन अधिग्रहीत झाल्याबाबत आलेले मोबदल्यास प्रतिवादी क्र. २ आशा आणि क्र. ३ सुजाता यांनी आक्षेप नोंदवला होता. हे मला सांगता येणार नाही की, त्या मोबदल्यापैकी १७९६८/- रुपये आशाबाई हीस मिळाले होते. हे मला सांगता येणार नाही की, प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी माझ्याविरुध्द औरंगाबाद येथील दिवाणी न्यायालय व.स्तर येथे दावा क्र. १६२/१९९८ दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, फेर क्र. ५०२४ प्रमाणे त्याची नोंद झाली आहे. आज देखी ७/१२ उता-या प्रमाणे त्याच्या नावे नोंद कायम आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या नावे नोंद झालेल्या फेरला आक्षेप नोंदवला नव्हता. मी एस.डी.एम.ला आणि कलेक्टर

यांच्याकडे अर्ज केला होता. मी अपील दाखल केले नव्हते. हे मला सांगता येणार नाही की , वादींनी त्या फेरबाबत आक्षेप घेतला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १३९/1 मध्ये माझ्या नावे १९ आर जमीन आहे. प्रतिवादी क्र. २ आशाबाईनी वादी क्र. ५ निर्मलाबाई विरुध्द छावणी पोलिस स्टेशन औरंगाबाद येथे सन १९८१-८२ मध्ये तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी माझ्याविरुध्द कौटुंबिक न्यायालयात पोटगीचा दावा दाखल केला आहे. माझ्यात व इतर प्रतिवादी क्र. ४ ते १२ यांच्यामध्ये सन १९९५ -९६ मध्ये शेतमिळकतीची वाटणी झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात व भावात झालेल्या वाटणीविरुध्द वादींनी आक्षेप घेतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात वाद चालू असल्याने माझे प्रतिवादी क्र. २ व ३ सोबत बोलणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि वादी आज रोजी एकत्र राहण्यास आहे. वादी क्र. १ सुमित व वादी क्र. २ प्रणित सिडको येथे राहण्यास आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते फुलंब्रीला येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ व ३ हे त्यांच्या नावे असलेल्या ४१ आर जमीनीची वहिती करतात. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या नावे आलेली जमीन न्यायालयामार्फत पोटगी म्हणून मिळाल्याने माझा त्या जमीनीत अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व वादींनी प्रतिवादी क्र. २ व ३ ची जमीन हडप करण्यासाठी संगनमताने दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष दिली.

**<u>प्रतिवादी क्र. ८ ते १२ तर्फे साक्षीदाराचा उलट तपास ॲड श्री बी.पी. जाधव यांच्यामार्फत -</u>**

प्रतिवादी क्र. ८ ते १२ यांनी प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा उलट तपास अंगीकारला.

**<u>प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश झाल्याने उलट तपास नाही.</u>**

**उलट तपास पूर्ण.**
**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत                                समक्ष

**(धनंजय एस.देवरे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फुलंब्री**
**दि.१२.०४.२०२४.**